**BDC LIBRARY**

**New Paper Clipping**


*A.Y. 2024-2025*

# पर्यावरण जतन, जागृती व संवर्धनाची लोकचळवळ उभी करूया

## संजीव चव्हाण यांचे प्रतिपादन, जिल्हास्तरीय पर्यावरण जतन, जागृती व संवर्धन मोहिमेचे उद्घाटन

वार्ताहर
पाटण

मानवी अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी जैवविविधतेचे जतन व संवर्धन करणे अत्यंत गरजेचे आहे. वसुंधरेचं ऋण फेडण्यासाठी पर्यावरणाचे जतन व संवर्धन करण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे. पर्यावरण जतन, जागृती व संवर्धन ही आता लोकचळवळ उभी करूया, प्रतिपादन कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण यांनी केले.



येथील कोयना एज्युकेशन सोसायटीच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय पर्यावरण जतन, जागृती व संवर्धन मोहिमेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी पर्यावरण तज्ज्ञ सुधीर कुंभार, डब्लूआरसी संचालक सुनील काळे, पर्यावरण जतन व संवर्धन जागृती मोहिमेचे समन्वयक प्रा. सुनील पानस्कर, प्राचार्य डॉ. शिरीषकुमार पवार, पर्यावरण जतन व संवर्धन सदस्य प्रा. सतीश गायकवाड, प्रा गजाजन कुंभार, प्रा. डॉ. हेमलता काटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

संजीव चव्हाण म्हणाले, पर्यावरणाचा समतोल बिघडणे म्हणजे मानवाच्या अस्तित्वाला धोका निर्माण होणे होय. पर्यावरणाच्या संवर्धनातून वसुंधरेचा बचाव करणे ही काळाची गरज आहे. पृथ्वीवरील मानवजातीचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन महत्वाचे आहे. वृक्षतोड कुठल्याही परिस्थितीत रोखली पाहिजे. 'आपणही जगा अन् इतरांनाही जगू द्या' हे ध्येय उराशी बाळगून पर्यावरण जतन, जागृती व संवर्धन ही लोकचळवळ उभी करूया.

यावेळी विविध स्पर्धेत प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमास विविध शाळांचे मुख्याधापक, शिक्षक, विद्यार्थी, पालक उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. सतीश गायकवाड यांनी केले. प्रा. विनायक मथणे यांनी आभार मानले.